कार्यालय :- महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/ससनर/ 117 /२०१७
दि. :- 31 /०६/२०१७

प्रति,

अमरावती गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,
अमरावती. (म्हाडा)

विषय :- मौजा अकोली ता.जि. अमरावती. येथील शेत सर्व्हे नं. ४७,५७,५८/४ मधील क्षेत्र ५० हे. ९९ आर. सिमांकित अभिन्यासास नकाशा निवासी वापराकरीता सुधारित अंतीम मंजूरीची परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- आपला दिनांक १७.०६/२०१७ चा अर्ज.

संदर्भाधीन अर्जासोबत प्राप्त झालेल्या प्रकरणातील सिमांकित अभिन्यास नकाशाची सविस्तर छाननी केली असता सदर अभिन्यास नियोजनाच्या माध्यमातून सर्वसाधारणपणे योग्य आढळून येत असल्यामुळे अभिन्यास मंजुरीची तर व अभिन्यासाखालील जागा निवासी वापराकरिता परिवर्तीत करण्यासाठी खालील शर्ती व अटींवर शिफारस करण्यात येत आहे.

१) सक्षम अधिका-याचे पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही भुखंडाचे भविष्यात विभाजन करता कामा नये.
२) अभिन्यासातील खुली जागा/ बगीचा/ खेळाचे मैदान/ दुकान/ शाळा/ बालवाडी इत्यादी करीता प्रस्तावित केलेल्या जागे व्यतिरिक्त संपूर्ण निवासी अभिन्यासातील भुखंड फक्त निवासी वापराकरिताच अनुज्ञेय राहतील.
३) सार्वजनिक उपयोगाकरिता प्रस्तावित केलेल्या खुल्या जागेचा/ भुखंडाचा उपयोग/ वापर त्याच कामाकरिता करण्यात यावा.
४) अभिन्यासातील रस्ते व सार्वजनिक खुली जागा विकसित केल्यानंतर देखरेखीकरिता विनामुल्य मनपाकडे हस्तांतरीत करावे लागेल.
५) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत आवश्यक ते विकास शुल्क भरणा करुन मनपाची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय या जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.
६) विषयांकित जागेतून उच्च दाबाची विद्युत वाहीनी किंवा दुरध्वनीवाहीनी जात असल्यास ती रस्त्याच्या कडेला स्थानांतरीत केल्याशिवाय भुखंडाची विक्री किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.
७) इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करावे.
८) अभिन्यासातील विक्री करण्यात आलेल्या प्रत्येक भुखंडाच्या विक्रीची माहिती (खरेदीखताची प्रत) या विभागात नोंदविणे आपल्याला बंधनकारक राहील.
९) सदर अभिन्यासाचे जमिनीच्या सिमेबाबत तसेच भुखंडाचे क्षेत्रफळाबाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी अभिन्यास मालकाची राहील व त्याची नुकसानभरपाई करुन द्यावी लागेल.
१०) सदर अभिन्यासातील प्राथमिक विकास कामे, रस्ते, नाल्या, इलेक्ट्रीफिकेशन, चेनलिंक इत्यादी कामांमध्ये अभिन्यास मंजुरीचे दिनांकापासून पुढील तीन वर्षात काही दोष निर्माण झाल्यास त्याची दुरुस्ती व देखभाल अभिन्यास मालकास स्वखर्चाने करुन देणे बंधनकारक आहे.
११) अभिन्यासातील भुखंडावर बांधकाम करताना छतावरील पावसाचे पाणी संकलन त्याचे जमिनीमध्ये पुनर्भरण करण्याच्या प्रकल्पाचे बांधकाम करणे महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार बंधनकारक राहील.
१२) या पुर्वी पत्र क्र. अमनपा/स.स.न.र./अभिन्यास/ ता.म/०१/९९ दि.०६/०४/९९ दिलेली मंजुरी रद्द करण्यात येत आहे.
१३) रेल्वे हद्दी पासुन ३० मी. अंतरा पर्यंत विकास कामा करिता रेल्वे Athourity चे ना- हरकत प्रमाण पत्र आवश्यक राहिल.
(मा. आयुक्त यांचे दि. १७/०६/२०१७ चे आदेशान्वये)
सहपत्र : मंजुर सिमांकित नकाशा २ प्रती.

स्वा/-
**सहाय्यक संचालक नगर रचना**
**महानगरपालिका, अमरावती.**

**प्रतिलिपी :**

१) मा. जिल्हाधिकारी अमरावती यांना माहितीकरीता व आवश्यक कार्यवाहीकरीता सादर.
अर्जदाराचे विषयांकित जागेवरील **५० हे. ९९ आर.** सिमांकित अभिन्यास नकाशास मंजुरीची शिफारस केल्यानुसार कृषक रुपांतरण परवानगी देताना वरील प्रमाणे अटी व शर्ती प्रस्तावित करुन अकृषक आदेशाची प्रत व मंजूर नकाशाची प्रत कृपया या कार्यालयास पाठविण्यात यावी. ही विनंती.
१) उप अधिक्षक भुमी अभिलेख अमरावती यांना माहितीकरीता सादर.

सहपत्र : मंजुर सिमांकित नकाशाची प्रत.

**सहाय्यक संचालक नगर रचना**
**महानगरपालिका, अमरावती.**

Scanned by CamScanner